**नियमित फौजदारी खटला क्र.१३६/२०२३** **निशाणी क्र.१५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

मी शपथेवर कथन करतो की,

**नाव – संदिप शिवाजी ठुबे**

वय – ३८ वर्षे

कामधंदा – मजुरी

राहणार – लांडे वस्ती रोड, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**सरतपास**

**अभियोग पक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. दराडे यांचे मार्फत –**

०१ दि.१९/०४/२०२३ रोजी मला शेवगाव पोलीसांनी पंचनाम्यास जाण्यासाठी बोलावले नव्हते. माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. मी पंचनाम्यावर सही केली होती. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविला, त्यावर अनु. ०१ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूराबाबत मला माहीती नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा.सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवानगी देण्यात आली.)**

०२ हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०४/२०२३ रोजी मला शेवगाव पोलीसांनी, शेवगाव ते नेवासा रोडवर, धनंजय ग्रेनाईट या दुकानासमोर घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ मला फिर्यादीने दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी एक विट पडलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर विटेने मारहाण झाल्याचे व तेथे घटना घडल्याचे फिर्यादीने सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी विट जप्त केली व सदर ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पोलीसांनी मला वाचून दखविला व त्यानंतर पंचनाम्यावर मी सही केली होती. मला वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वाचल्यानंतर सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा आहे व त्याला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास**
**आरोपीतर्फे वकील श्री. एस. बी. सानप यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.06.08 13:12:26 +0530

दिनांकः–०८/०६/२०२६

(वैशाली सं. मोरे),
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव